RNI No. MAHBIL /2009/31745

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—मध्य उप-विभाग

वर्ष १२, अंक ४२ (३)] गुरूवार, जून २५, २०२६/आषाढ ४, शके १९४८ [पृष्ठे २, किंमत : रुपये ४.००

**असाधारण क्रमांक १०१**

**प्राधिकृत प्रकाशन**

### सामान्य प्रशासन विभाग

**अधिसूचना**

क्रमांक डीआयपी-२०२६/प्र.क्र.११९/राशि-१, दिनांक १८ जून, २०२६.—आंतरराष्ट्रीय किर्तीच्या ज्येष्ठ गायिका श्रीमती आशा भोसले यांचे रविवार दिनांक १२ एप्रिल, २०२६ रोजी मुंबई येथे दुःखद निधन झाले. मा.राज्य मंत्रीमंडळाने खालीलप्रमाणे ठराव पारित करून श्रध्दांजली अर्पण केली :–

श्रीमती आशा भोसले यांचा जन्म दिनांक ८ सप्टेंबर, १९३३ रोजी संगीत क्षेत्रात अपूर्व योगदान देणाऱ्या मंगेशकर कुटुंबात सांगली येथे झाला. त्यांना वडील मास्टर दीनानाथ मंगेशकर यांच्याकडून संगीताचा वारसा लाभला. त्या आशाताई नावाने प्रसिद्ध होत्या. आशाताईंनी मराठीसह अनेक भारतीय भाषांमध्ये चित्रपट गीते गायली.

आशाताईंच्या स्वरांमुळे हजारो गाणी लोकप्रिय झाली. शेकडो चित्रपटांना ओळख मिळाली. आशाताईंचा स्वर चित्रपटातील अनेक प्रसंगांना जिवंत करत असे. रसिकांच्या प्रत्यक्ष जीवनातलेही अनेक प्रसंग आशाताईंच्या स्वरांनीच साजरे होत असतात. मग ते आनंदी असोत वा दुःखी आशाताईंचा स्वर अनेक पिढ्यांना आपलासा वाटतो. हीच त्यांच्या स्वरांची ताकद राहिली. खट्याळ, मिश्किल, मादक-मोहक, तरल आणि दर्दभऱ्या आवाजासह अलिकडच्या पॉप आणि रँपच्या जमान्यातही आशाताई आपल्या स्वरांनी समयोचित राहिल्या.

गेली आठ दशके त्यांची गाणी जुन्या-नव्या पिढीच्या हृदयात आणि ओठांवर रुंजी घालत राहीली आहेत, आणि यापुढेही राहतील. या अर्थाने आशाताई स्वरांनी अजरामर आहेत. आशाताईंना पद्मविभूषण पुरस्कारसह, आंतरराष्ट्रीय स्तरावर संगीत क्षेत्रातील ग्रॅमी ॲवार्ड, चित्रपट सृष्टीतील राष्ट्रीयस्तरावरील दादासाहेब फाळके पुरस्कार, महाराष्ट्र भूषण यांसह अनेक पुरस्कार, सन्मान मिळाले आहेत.

आशाताईंचे निधन भारतीयांसाठी, नव्हे तर जगभरातील त्यांच्या रसिक चाहत्यांसाठी शोकदायी आहे. आशाताईंच्या निधनाने भारतीय कला क्षेत्राची मोठी हानी झाली आहे. आपण महान प्रतिभावंत कलावंताला मुकलो आहोत. ज्येष्ठ गायिका श्रीम. आशा भोसले यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो, या प्रार्थनेसह श्रीम. आशा भोसले यांच्या निधनाबद्दल मा. राज्य मंत्रिमंडळाने तीव्र शोक व्यक्त केला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**राजेश अग्रवाल,**
मुख्य सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.